महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ४५ वे | दिनांक : ०५/०२/२०२६ | वार : गुरूवार

## विमान अपघातावर प्रश्न विचारला तर भाजपला राग का? - सुषमा अंधारे



**सोलापूर :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी अजित पवार यांच्या विमान अपघाताप्रकरणी पुन्हा एकदा भाजपवर निशाणा साधला आहे. अजित पवार हे राज्याची संपत्ती होते. त्यामुळे त्यांच्या विमान अपघातावर प्रश्न विचारला तर भाजपला राग का येतो? असे त्यांनी म्हटले आहे.

सुषमा अंधारे सध्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या प्रचारासाठी सोलापूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहेत. त्यांनी तेथील एका प्रचारसभेत बोलताना भजापवर उपरोक्त प्रश्नांची सरबत्ती केली. त्या म्हणाल्या, मी प्रचाराचे काही बोलणार नाही. कारण, सोन्यासारखा माणूस आपल्यातून निघून गेला. अजितदादा राज्याची संपत्ती होते. ते म्हणतात ना की, लाख जावो, पण लाखोंचा पोशिंदा जगला पाहिजे. त्यामुळे हा प्रश्न विचारण्याचा राज्यातील प्रत्येक माणसाला हक्क आहे. अजित पवारांच्या विमान अपघाताची माहिती उड्डयण नियामक मंडळाने दिली पाहिजे. पण भाजपच वेगळी उत्तरे देत आहे. या प्रकरणी अनेक प्रश्न अुत्तरीत आहेत. कुणाकडूनही ठोस उत्तर मिळत नाही. अजित पवारांचा घातपात झाल्याचा संशय व्यक्त होत आहे. याचा भाजपला राग का येत आहे? आंतरराष्ट्रीय उड्डाण नियामक मंडळाने वर्षभरापूर्वी बंदी घातलेले विमान अजित पवारांच्या प्रवासासाठी का वापरले? अजित पवार स्वतःची फार काळजी घेत होते, ते हे विमान कसे वापरतील? असे विविध प्रश्न त्यांनी या प्रकरणी उपस्थित केलेत.

सुषमा अंधारे यांनी यावेळी सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या प्रचारसंभांवरही निशाणा साधला. पालकमंत्री जयकुमार गोरे पंचायत समितीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ सभा घेत असतील, तर गावच्या गणपती मंडळाच्या अध्यक्ष निवडीसाठीही ते बैठक घेतील, असे त्या म्हणाल्या.

उल्लेखनीय बाब म्हणजे सुषमा अंधारे यांनी अजित पवारांच्या अस्थिकलशावरून नुकतीच राष्ट्रवादीचे कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल व प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्यावर टीका केली होती. राख थंड होण्याच्या आधी पक्ष बळकवणारे लोक तुम्ही... संवेदना नावाची कुठलीच गोष्ट शिल्लक नाही पण जनाची नाही तर किमान मनाची... असे असंख्य अस्थिकलश तयार करून आता त्याचेही मार्केटिंग करणार आहात का? असा प्रश्न त्यांनी या प्रकरणी उपस्थित केला होता.

दरम्यान, अजित पवार यांचे गत बुधवारी झालेल्या एका विमान अपघातात मृत्यू झाला होता. त्यांच्या निधनानंतर राज्याच्या राजकारणात एक मोठी पोकळी निर्माण झाल्याचे चित्र आहे. विशेषतः राष्ट्रवादी काँग्रेसच्या कथित विलीनीकरणाचा मुद्दाही आता थंड बस्त्यात पडल्याचे सांगण्यात येत आहे.

## प्रकाश आंबेडकरांची थेट गृह खात्याच्या मंत्र्यांना कोर्टात बोलावण्याची मागणी




**छत्रपती संभाजीनगर :** शहीद सोमनाथ सूर्यवंशी प्रकरणात एक मोठी अपडेट आली आहे. या प्रकरणी आज मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात झालेल्या सुनावणीत सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबीयांतर्फे युक्तिवाद करणाऱ्या प्रकाश आंबेडकरांनी थेट गृह खात्याच्या मंत्र्यांना कोर्टात बोलावण्याची मागणी केली. बीएनएस १९६ कायद्यानुसार पोलिस कोठडीतील मृत्यूनंतर मॅजिस्ट्रेट यांनी चौकशी केल्यानंतर पुढे काय करायचे? याविषयी कायद्यात कोणतीही स्पष्ट तरतूद नाही. केंद्र किंवा राज्य सरकारने त्यात आजतागायत दुरुस्ती केली नाही, असा मुद्दा त्यांनी या प्रकरणी उपस्थित केला आहे.

प्रकाश आंबेडकर आजच्या सुनावणीनंतर पत्रकारांशी बोलताना म्हणाले, शहीद सोमनाथ सूर्यवंशी यांच्या पोलीस कोठडीतील हत्या प्रकरणी आज मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात सुनावणी पार पडली. पोलीस खात्याचे प्रतिज्ञापत्र, गृहखात्याचे मुख्य सचिव यांचे प्रतिज्ञापत्र त्यांनी दाखल केले. बीएनएस १९६ कायद्यानुसार पोलीस कोठडीतील मृत्यूनंतर मॅजिस्ट्रेट यांनी चौकशी केल्यानंतर पुढे काय करायचे? या बाबतीत कायद्यामध्ये तरतूद नाहीये. केंद्र सरकार, महाराष्ट्र शासनाने यामध्ये आजतागायत दुरुस्ती केली नाहीये.

त्यामुळे न्यायालयाला आम्ही विनंती केली की, न्यायालयाने ज्यांना बोलावले आहे, त्यांना धोरणात्मक निर्णय घेण्याचा अधिकार नाहीये, त्यांना फक्त धोरणात्मक निर्णयाची अंमलबजावणी करण्याचा अधिकार आहे. त्यामुळे न्यायालयाने हा प्रश्न निकाली काढण्यासाठी, सोमनाथ सूर्यवंशीला न्याय देण्यासाठी स्वतः कोर्टाने कायद्यातील त्रुटी भरून काढावी किंवा गृह खात्याच्या मंत्र्यांना कोर्टाने बोलवावे आणि हा अपूर्ण कायदा पूर्ण करणार की नाही? यावर त्यांना विचारणा करावी. न्यायालयाने हे प्रकरण उद्या सकाळी सुनावणीसाठी ठेवले आहे.

## लैंगिक क्षमता वाढवणाऱ्या औषधांचा विषय थेट संसदेत



**मुंबई :** यौन क्षमता वाढवणारी औषधे वैद्यकीय सल्ल्याशिवाय तसेच प्रिस्क्रिपशनशिवाय सहजपणे विकल्या जात आहेत. अनेकदा अशी औषधे शरीरास हानिकारक ठरतात तसेच याच्या सेवनाने गंभीर परिणामही भोगावे लागतात. याच पार्श्वभूमीवर भाजप खासदार अजित गोपछडे यांनी थेट संसदेत लैंगिक क्षमता वाढवणाऱ्या गोळ्यांचा मुद्दा उपस्थित केला आहे. वैद्यकीय आणि मानसिकदृष्ट्या हे स्पष्ट आहे की, वैद्यकीय देखरेखीशिवाय या औषधांचे सेवन केल्याने हृदय व मानसिक आरोग्याला गंभीर हानी पोहोचू शकते. त्यामुळे लैंगिक क्षमता वाढवणाऱ्या औषधांबाबत सरकारने मार्गदर्शक सूचना जारी कराव्यात, अशी मागणी राज्यसभा खासदार अजित गोपछडे यांनी केली आहे.

संसदेत बोलताना अजित गोपछडे म्हणाले, सर्वोच्च न्यायालयाने हे स्पष्ट केले आहे की, ही औषधे एनडीपीएस अधिनियमांतर्गत येत नसून असामाजिक तत्वांकडून याचा दुरुपयोग केला जात आहे. सभापती महोदय, सर्वच राज्य आणि केंद्र सरकारने संबंधित गोळ्यांच्या, औषधांच्या अवैध विक्रीवर कारवाई करावी. तसेच औषधांबाबत मार्गदर्शक सूचना जारी कराव्यात, अशी मागणी गोपछडे यांनी केली आहे.

दरम्यान, संसदेत बोलताना अजित गोपछडे यांनी अर्थसंकल्पावरही सकारात्मक प्रतिक्रिया देत म्हणाले, सुट्टीच्या दिवशी अर्थसंकल्प सादर होतो आहे, आमचे सरकार एकही दिवस सुट्टी घेत नाही. तसेच पुढे ते म्हणाले, भारत-युरोप ट्रेड डील हा देशाला पुढे नेणारा करार आहे. काँग्रेसच्या लोकांचा अभ्यास कच्चा आहे, आमच्या जेनेरीक औषधांना, लेदर मालाला मोठ्या प्रमाणावर निर्यात मागणी वाढेल. काँग्रेसच्या लोकांना जे जमले नाही ते आमच्या सरकारने करून दाखवले आहे. त्यामुळे कॉंग्रेसने अभ्यास करावा, असा खोचक सल्ला गोपछडे यांनी दिला आहे.

लैंगिक क्षमता वाढवणाऱ्या गोळ्यांच्या अतिरिक्त सेवनाने डोके आणि छातीत दुखणे, चक्कर येणे, हृदयाची धडधड वाढणे, चेहऱ्यावर सूज येणे, श्वसनासंबंधी समस्या उद्भविणे, डोळे लाल होणे अशा विविध समस्यांचा सामना करावा लागतो. तसेच, या गोळ्यांच्या अतिसेवनाने प्रिंपीसम हा आजरा होतो.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ०५ फेब्रुवारी २०२६


## प्रा. विश्वास गव्हाणे यांना आदर्श शिक्षक पुरस्कार




**छत्रपती संभाजीनगर :** बी. द. चेंज फाउंडेशन तर्फे दिला जाणारा आदर्श शिक्षक पुरस्कार 2026 प्रतिष्ठान महाविद्यालयातील प्रा. विश्वास सयाजीराव गव्हाणे यांना शिक्षण क्षेत्रातील उत्कृष्ट सेवा, उल्लेखनीय योगदानाची तसेच सहशालेय कार्यामधील निष्ठावान सेवेची दखल घेऊन आणि समाजात सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्यासाठी समर्पित प्रयत्नांसाठी शिर्डी येथे आयोजित पुरस्कार वितरण सोहळ्यामध्ये देण्यात आला. शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय प्रेरणादायी व समाज उपयोगी कार्य करणाऱ्या शिक्षकांचा सन्मान करण्यासाठी या गौरव सोहळ्यात महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यातून निवड झालेल्या आदर्श शिक्षकांना या सोहळ्यामध्ये सन्मानित करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने कार्य करणाऱ्या शिक्षकांचा सन्मान व्हावा, त्यांच्या कार्याला समाज मान्यता मिळावी तसेच नव्या पिढी समोर शिक्षकांचे प्रेरणादायी कार्य अधोरेखित व्हावे या उद्देशाने हा सोहळा आयोजित करण्यात आला होता. गव्हाणे यांना पुरस्कार मिळाल्या बद्दल प्रतिष्ठान शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा. रविंद्र पाटील शिसोदे, सचिव मा. राजेंद्र पाटील शिसोदे, श्री सुशील पाटील शिसोदे, प्राचार्य डॉ. एस. जी. सोनकांबळे उपप्राचार्य व्ही. एस. चाटे, प्रबंधक शेखर शिंदे, अधीक्षक इम्रान पठाण, प्रा. संतोष गव्हाणे, प्रा. संतोष तांबे, प्रा. डॉ. राजेश करपे, प्रा. डॉ. अमोल म्हस्के, प्रा. युवराज औटे , प्रा. जयश्री गायकवाड , श्री दीपक गव्हाणे, श्री दीपक पालवे, आदींनी अभिनंदन केले

## सिद्धार्थ पॅरामेडिकल कॉलेजमध्ये सुभेदार रामजी आंबेडकर यांना अभिवाद



**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य परिषदेच्या वतीने दि. २/०२/२०२६ रोजी सिद्धार्थ पारामेडिकल कॉलेज कमलनगर हौसिंग सोसायटी पेठेनगर येथे संध्याकाळी ६:३० वाजता सुभेदार रामजी आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष. डॉ मोहन सौंदर्य हे होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. युवराज धबडगे यांनी केले या कार्यक्रमाचे प्रमुख उपस्थिती मा. भारत जमधडे यांची होती.तर प्रमुख वक्ते डॉ. मिलिंद वाव्हळे यांनी सुभेदार रामजी आंबेडकर यांचे जीवन आणि कार्य याची माहिती दिली. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जडण घडणीत सुभेदार रामजी आंबेडकर यांचे मोठे योगदान आहे. असे ते म्हणाले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. बाळासाहेब गायकवाड यानी केले. तर आभार डॉ धनंजय रायबोले यांनी मानले.या कार्यक्रमाला सर्व पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते.

## "पुस्तक हे मस्तक घडविते" - अय्युब पठाण लोहगावकर



**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) :** बालभारतीच्या पाठयपुस्तकातील प्रसिध्द कवी तथा साहित्यिक अय्युब पठाण लोहगावकर यांनी नुकतेच संभाजीनगर जवळील राहटपटटी तांडा येथील जिल्हा परीषदेच्या शाळेत मराठी भाषा पंधरवाडा संवर्धनाच्या निमित्ताने साहित्यविषयाचा कार्यक्रम घेतला त्याप्रसंगी साहित्यिक अय्युब पठाण यांनी विद्यार्थी यांना मार्गदर्शन करतांना सांगितले की, " मुले आणि मुलींनी वाचनाविषयी महत्व सांगितले, आजच्या तंत्रज्ञानाच्या जमान्यात विद्यार्थी यांचे मोबाईलच्या नादामुळे मैदानी खेळ, आणि वाचनाकडे दुर्लक्ष होत आहे. परंतु पुस्तक वाचनाने मस्तक घडविते. आणि मैदानी खेळाने बुध्दी चंचल होऊन प्रकृतीत सुधारना होते. तसेच वाचनाने ज्ञानाच्या कक्षा रूंदावतात आणि वर्तनातून चांगले परिवर्तन होते. असे मार्गदर्शन श्री. पठाण यांनी केले. यावेळी शाळेतील मुख्याध्यापक किरण आंबेकर, शिक्षक मनोज खुटे, अनिल दाणे आणि शाळेतील विद्यार्थी व पालकवर्ग मोठया संख्येने उपस्थित होते.शेवटी कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

## पर्यावरणातील बदलांमुळे पिकांवर रोगराई — प्रा. डॉ. उमेश मोगले




**जालना (प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे) :** सततच्या पर्यावरणातील बदलामुळे पिकांवर अनेक प्रकारचे परिणाम होऊन रोगराई पसरत आहे त्यामुळे उत्पादनात घट होताना दिसते असे प्रतिपादन मांडवा येथे जे इ एस महाविद्यालयच्या विशेष श्रम संस्कार शिबिरात प्रा डॉ उमेश मोगले यांनी केले. जेइएस महाविद्यालय जालनाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे मांडवा येथे विशेष श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन दि 29 जानेवारी ते 4, फेब्रुवारी 2026, दरम्यान करण्यात आले आहे, सहाव्या दिवशी बौद्धिक क्षेत्रात पर्यावरणातील बदल व शेती या विषयावर वनस्पती शास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. उमेश मोगले यांच्या विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षपदी प्रा.डॉ. विलास जाधव होते. व्यासपीठावर प्रा. डॉ.वसंत पवार यांची उपस्थिती होती. यावेळी बोलताना प्रा. डॉ. मोगले म्हणाले की, सततच्या वातावरणातील बदलामुळे शेतीतील पिकांवर अनेक प्रकारचे रोग पडत असून त्यामुळे पिकांच्या उत्पन्नात घट होत आहे अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. पिकावर पडणाऱ्या विविध रोगांची त्यांनी माहिती दिली असून त्यावर उपाययोजना काय करावी त्यांनी सांगितले. पॅकिंग फूड चांगले आहे काय याची खात्री करूनच ते खावे असेही डॉ. मोगले यांनी सांगितले. अध्यक्षीय समारोप करताना प्रा. डॉ. जाधव म्हणाले की वातावरणातील बदलांमुळे शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणावर हानी होत आहे. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे विभागीय समन्वय प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. राजेश सरकटे ,प्रा.योगेश लहामाटे, प्रा. किशोर तापडिया, प्रा प्रकाश पवार, डॉ बाबू तोटरे, प्रा. सतीश लोंढे प्रा.सुजाता रगडे, प्रा धनश्री देशपांडे, प्रा .मनीषा सुतार आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नागेश पवार यांनी केले तर पाहुण्यांचा परिचय गजानन माटे यांनी केला ,तर उपस्थित त्यांचे आभार प्रितेश चव्हाण मानलेत.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ०५ फेब्रुवारी २०२६


## अधोगती

अरे माणसा माणसा
करू नकोस वाईट कर्म
देह नश्वर आहे
जानून घे जीवनाचे मर्म

दुसऱ्याच्या वैभवाचा
करू नकोस हेवा
कष्ट करूनी, घाम गाळूनी
मिळव मेहनतीचा मेवा

गरजवंतांना दे सदा
मदतीचा हात
संकटाच्या वेळी मिळेल
त्याची तुला साथ

नको सोडू बंधुभाव
नको सोडू ममता
सर्वावर प्रेम करुनी
हृदयी बाळग समता

अरे माणसा माणसा
जप आपुलकीची नाती
अनितीच्या मागे धावूनी
करू नकोस अधोगती



**- रविंद्र व्ही. चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि. यवतमाळ
मो.9011559106

## मातीशी इमान ठेवून

मातीशी इमान ठेवून
मातीत अवघं आयुष्य घालून
मातीमोल झाला बाप..

अन् म्हणाला
माती आईच आपली
पण वाटा अडवल्या जगण्याच्या
मातीत राबणाऱ्या हातांच्या..

म्हणून जरा निघ बाहेर
गाव शिवाराच्या
लाव हातभार..घराला ..

किती दिवस राहतो
माझ्या अन् वावराच्या भरोश्यावर?

अन् निघालो मी अनोळखी वाटेने
पोटापाण्याच्या शोधात..

आता पोट भरतंय
बाहेर राहून ही..

पण मन तिथंच गुंतलं
माय माती माणसाबरोबर
माझ्या गाव शिवारात..



**ज्ञानेश्वर गायके,**
कन्नड


## जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |


# मातोश्री गंगादेवी माधवराव पाटील यांचे पाचवे पुण्यस्मरण




**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** येथील स्व. गंगादेवी माधवराव पाटील यांची बुधवारी ( ता. ४ ) रोजी पाचवे पुण्यस्मरण श्री माधवराव पाटील महाविद्यालय व माधवराव पाटील कॉलेज ऑफ फार्मसी येथे साजरे करण्यात आले. स्व. मातोश्री गंगादेवी माधवराव पाटील यांच्या प्रतिमेस उपप्राचार्य डॉ. चंद्रकांत बिराजदार यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी डॉ. सुधीर पंचगल्ले, डॉ. आप्पासाहेब सूर्यवंशी, डॉ. रवींद्र आळंगे, डॉ. सुभाष हुलपल्ले, डॉ. अविनाश मुळे, डॉ. महेश मोटे, डॉ. शिवपुत्र कनाडे, डॉ. रवींद्र गायकवाड, डॉ. किरण राजपूत, डॉ. सुजित मठकरी, डॉ. जयश्री सोमवंशी, डॉ. संध्या डांगे, डॉ. शीला स्वामी आदींची उपस्थिती होती. प्रा. पायल आगरकर, प्रा. वैष्णवी पाटील, प्रा. विनंती बसवंतबागडे, प्रा. प्रियंका काजळे, राजू ढगे, दत्तू गडवे आदींनी पुढाकार घेतला. प्रतिभा निकेतन विद्यालयात मुख्याध्यापक उल्हास घुरघुरे, परिवेक्षक विवेकानंद परसाळगे, प्रा. उमाकांत महामुनी, प्रतिभा निकेतन इंग्लिश स्कूलमध्ये मुख्याध्यापिका अनुराधा जोशी, सच्चिदानंद अंबर, जगदीश सुरवसे, भुसणीचे मुख्याध्यापक प्रेमनाथ आपचे तर नूतन विद्यालयात मुख्याध्यापक राजशेखर कोरे, बळीराम गंगणे, युवराज खताळ, कविता कदम आदींच्या हस्ते मातोश्री गंगादेवी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी माधवराव पाटील कॉलेज ऑफ फार्मसी, प्रतिभा निकेतन कनिष्ठ महाविद्यालय, प्रतिभा निकेतन विद्यालय, मुरुम, कोथळी, भुसणी व नूतन प्राथमिक शाळा, प्रतिभा निकेतन इंग्लिश स्कूल, मुरुम आदी विद्यालयातही अभिवादन कार्यक्रम घेण्यात आला. मातोश्री गंगादेवी माधवराव पाटील यांनी प्रतिकूल काळात स्वर्गीय माधवराव (काका) पाटील यांच्या पाठीशी खंबीरपणे उभ्या राहिल्या. त्यामुळे त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव माजी राज्यमंत्री बसवराज पाटील हे राज्याचे सक्षम नेतृत्व करत सामाजिक-राजकीय क्षेत्रात एक वेगळा ठसा उमटविला आहे. तरदुसरे चिरंजीव धाराशिव जिल्हा बँकेचे अध्यक्ष बापूराव पाटील हे सहकार क्षेत्रातून जिल्ह्याचे नेतृत्व करीत आहेत. कृषी व शिक्षण क्षेत्रात देखील त्यांनी स्वत:ची वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांचे नातू शरण पाटील राज्यभर युवकांची बांधणी करून युवकांचे संघटन वाढवीत आहेत. उमरगा जनता बँकेच्या माध्यमातून तरुणांना अधिक व्यवसायभिमुख बनवून सहकार क्षेत्र अधिक मजबूत करण्यावर त्यांचा भर आहे. या सर्वांना सुसंस्कारित
विचार देण्यामध्ये मातोश्री गंगादेवी माधवराव पाटील यांचा मोलाचा वाटा राहिला, असल्याचे उल्हास घुरघुरे यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक, प्राध्यापिका, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विविध शाखेचे विद्यार्थी-विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होत्या.

# बीड जिल्हयामध्ये इयत्ता १० वी व इ.१२ वी परीक्षेसाठी कॉपीमुक्त अभियान राबवावे-जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

**बीड (भगवंत पाळवदे) :** दक्षता समितीची बैठक जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, यांच्या अध्यक्षतेखाली दि.०३ फेब्रुवारी २०२६ रोजी घेण्यात आली. या बैठकीसाठी सर्व समिती सदस्य उपस्थित होते. तसेच दूरदृश्य प्रणालीव्दारे तहसिलदार, गटविकास अधिकारी व गटशिक्षणाधिकारी उपस्थित होते. सदर बैठकीत जिल्हाधिकारी यांनी प्रत्येक परीक्षा केंद्रावरील प्रत्येक वर्गखोलीत CCTV कैमेरे बसवून ते कार्यान्वयीत करावेत, संवेदनशील परीक्षा केंद्रावर आवाजाचे रेकॉर्डीग होणारे CCTV कैमेरे बसवावेत, त्याची तपासणी तहसिलदार, गटविकास अधिकारी व गटशिक्षणाधिकारी यांनी पुढील दोन दिवसात करावी व त्याचा अहवाल सादर करावा, तसेच CCTV कैमे-यांचे ॲक्सेस जिल्हास्तरावर कंट्रोल रुम स्थापन करून तेथे घेण्यात यावेत, संवेदनशील परीक्षा केंद्रावरील आणि ज्या परीक्षा केंद्रातील वर्ग खोलीमध्ये CCTV कॅमेरे नसतील, तेथील केंद्रसंचालक, पर्यवेक्षक व परीक्षेशी संबंधित इतर कर्मचारी यांची अदलाबदल करावी, परीक्षाकेंद्रावर नियुक्त कर्मचा-या व्यतीरिक्त इतर कर्मचारी तसेच व्यक्तीना प्रवेश देऊ नये, इतर कर्मचारी परीक्षा केंद्रावर आढळल्यास त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी, परीक्षा केंद्रावर अनुदानित, अंशतः अनुदानित व जिल्हा परिषदेचे शिक्षक व इतर कर्मचारी नेमावेत, परीक्षा केंद्रावरील सर्व कर्मचाऱ्यांसाठी ओळखपत्र अनिवार्य करण्यात यावे, तालुकास्तरावरुन महत्वाच्या पेपरला वर्ग १ च्या अधिकाऱ्यांनी परीक्षा केंद्रांना भेटी द्याव्यात.बीड जिल्हयामध्ये कॉपीमुक्त अभियान राबवून जिल्हा कॉपीमुक्त होण्याच्या दृष्टीने संबधित यंत्रणेने प्रयत्न करावेत, तसेच संवेदनशील परीक्षा केंद्रावर जास्तीत जास्त लक्ष ठेवून परिक्षा सुरळीतपणे पार पाडण्यासाठी संबधित अधिकारी. कर्मचा-यानी लक्ष द्यावे असेही श्री. जॉन्सन या प्रसंगी म्हणाले. या VC बैठकीस संबधित अधिकारी उपस्थित होते. बीड जिल्हयामध्ये मंडळातर्फे उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इयत्ता १२ वी) व माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (इ.१० वी) फेब्रुवारी मार्च-२०२६ आयोजित केल्या आहेत. उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा दि.१०फेब्रुवारी ते दि.१८ मार्च २०२६ आणि माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा दि.२० फेब्रुवारी ते दि.१८ मार्च २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आल्या आहेत. फेब्रुवारी/मार्च-२०२६ चे सुयोग्य प्रकारे संचालन व्हावे, परीक्षा केंद्रावर गैरप्रकार होऊ नये यासाठी महाराष्ट्र शासन मुख्य सचिव यांनी दिनांक २७ जानेवारी २०२६ रोजी दूरचित्र प्रणालीव्दारे जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, पोलीस अधीक्षक तसेच परीक्षेशी संबंधित अधिका-यांची बैठक घेवून सूचना दिलेल्या आहेत. त्यामध्ये जिल्हा स्तरावर दक्षता समितीची बैठकः आयोजीत करून प्रत्येक परीक्षा केंद्रावर CCTV कैमेरे बर्सावणे, संवेदनशील परीक्षा केंद्रावरील केंद्रसंचालक, पर्यवेक्षक व इतर कर्मचारी यांची अदलाबदल करणे, बैठे पथक व भरारी पथक नियुक्त करणे याबाबत सुचना देण्यात आल्या आहेत. जिल्हा स्तरावर दक्षता समिती गठीत करण्यात आलेली आहे. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन अध्यक्ष, पोलीस अधिक्षक नवीनीत कॉवत सदस्य, मुख्य कार्यकारी अधिकारी, जितिन रहेमान सदस्य, कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण सदस्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य सदस्य, प्राथमिक शिक्षणाधिकारी सदस्य योजना शिक्षणाधिकारी सदस्य, माध्यमिक शिक्षणाधिकारी सदस्य सचिव आहेत. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांनी दि.२७ जानेवारी २०२६ रोजी दिलेल्या सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी. सर्व गटविकास अधिकारी यांनी जिल्ह्यातील सर्व ग्रामस्तरावर कॉपीमुक्त अभियानाची जनजागृती करावी तसेच गटशिक्षणाधिकारी यांनी सर्व शाळामध्ये मुख्याध्यापक व पालक यांना परीक्षेसंबंधित कॉपीमुक्त अभियानाची माहिती दयावी. आकाशवाणी व इतर प्रसार माध्यमांमध्ये कॉपीमुक्त अभियानाची प्रसिध्दी देण्यात यावी भरारी पथकांनी इंग्रजी, गणित व विज्ञान इत्यादी महत्वाच्या विषयांच्या पेपरच्या दिवशी संवेदनशील केंद्रांना भेटी द्याव्यात. परीक्षेचे चित्रीकरण ड्रोन कॅमेऱ्याद्वारे करावे. पोलीस विभागा मार्फत सर्व परिरक्षक कार्यालय व परीक्षा केंद्रावर पोलीस बंदोबस्त उपलब्ध करुन देण्यात यावा अशा सूचना त्यांनी दिलेल्या होत्या. परीक्षा केंद्रापासून ५०० मीटर परिसरात झेरॉक्स सेंटर परीक्षा कालावधीत बंद ठेवण्यात येणार आहे, तसेच संबंधित परीक्षा केंद्राच्या परीसरात प्रतिबंधात्मक उपायोजना लागू करण्यात येणार असून परीक्षा केंद्रावर गैर प्रकार घडल्यास गैरप्रकारांना प्रोत्साहीत करणारे, मदत करणारे व प्रत्यक्ष गैरमार्गाचा अवलंब करणाऱ्यांवर दखलपात्र व अजामीनपात्र गुन्हा दाखल करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येणार आहे. जिल्हा दक्षता समितीने इ.१० व १२ वी च्या परीक्षा शांततेत व तणावमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी व विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता वाढ होण्याच्या दृष्टीने जिल्हाभर कॉपीमुक्त अभियान प्रभावीपणे राबविण्याबाबतच्या उपाययोजना केलेल्या असून मुलांच्या शिक्षणाचा पाया मजबूत होण्यासाठी कॉपीमुक्त अभियान महत्वाची भूमिका असल्याचे जिल्हाधिकारी म्हणाले

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ०५ फेब्रुवारी २०२६

# लावण्या : अस्वस्थ ग्रामीण वास्तवाचे भेदक चित्रण




**म**राठी साहित्य मध्ये ख्यातनाम लेखक आबासाहेब घावटे ग्रामीण कथा कविता बालसाहित्य बालनाट्य अशा अनेक विध्द साहित्य प्रकार हाताळले आहेत.अनेक वाङ्मयीन संस्थेचे लक्षवेधी पुरस्काराने ते सन्माननीयत आहेत.एक निस्सीम भक्तीचे ज्ञानसाधक शिक्षक म्हणून ते लौकिक पात्र आहेत.तसेच ते योगसाधक असल्याने या ही ज्ञानाचे ते दानं करता आहेत.प्रस्तूत त्यांच्या 'लावण्या' या ग्रामीण कथासंग्रहात एकूण पंधरा कथा आहेत.या कथेचा आत्मा हा ग्रामीण वास्तवाचे विविध रंगढंग तर माणुसकीचे गहिरे रंग याचे दृश्य चित्रण या कथासंग्रहाचा अंतरंग आहे.लावण्या ही कथेतील नायिका अति सुंदर लावण्यवती.लहानपणीचं लग्न,तिचं सौंदर्य मनमोहक.पाहताक्षणी तिच्या मोहात पडणारी नजर.पुढे नवरा संशय घेणारा.तो दारुडा.तिचा मानसिक, शारिरीक छळ.लावण्या हे सारं सहन करीत.दोनं अपत्य.पुढे नवरा घर ही विकून टाकतो.लालण्या खाजगी संस्थेत नोकरी करते.नवरा अर्धांगवायू आजारी ती नीष्ठेने त्याची सेवा करते.पती निधनानंतर मुलीचं लग्न करते.मुलाचंही लग्न होते.मुलगा ही सांभाळत नाही.मुलगीही जवळ ठेवत नाही.लावण्याच्या उभ्या आयुष्यात सुख आनंद मिळतच नाही.ती अनाथ आश्रमात म्हातारे आईवडीलची सेवा करते.अशी ही संघर्षाची कथा मनाला उद्विग्न करुन जाते.प्रत्येक कथेमध्ये सुविचांराची पेरणी करत वाचकांच्या मनाचा ठाव घेणारी कथा येते आहे.जसे"लग्न हा स्त्रीला माहेर सोडून सासरला जाणारा विधी आहे.जिथून ती पुन्हा कधीही परत येऊ शकतं नाही.कधीही"...(पृष्ठ 16) युट्यूबवर प्रसारीत झालेली 'मिठूचा चहा' ही कथा मनाचा ठाव घेणारी'मृत्यूचे प्रमाणपत्र उघड्या डोळ्यांनी पाहावे लागते असा भोळा भाबडा मिठू या कथेत आहे.उभ्या आयुष्याचा नाश करून घेणारी वंदना,बेकरी शिकाऱ्याच्या जाळयात येते.ललितमय कथानुबंध अतिशय आशय संपन्न सृजन समर्पक झाल्याने ह्या कथा अतिशय उत्तम मानवी मनात विचारांची पेरणी करून जाते.मुरळी,मधूप्रकाश या कथांचा आविष्कार मनोवेधक होऊन जातात,वाचकांची अभिरुची संपन्न करणारी कथा बीजे असल्याने चिंतनाची किनार या कथांना आहे.कथेचा प्रारंभ करतांना निसर्ग वैभवाचा प्रतिमांचा लालित्यपूर्ण स्वानंद वर्णनात्मक आत्मनिरिक्षण मनमोहक होऊन आल्याने कथेचा आत्मा पक्का होऊन जातो.या मध्ये शहरी निमशहरी ग्रामीण वास्तवाचे विविध रंगढंग दिसून आलेले आहेत.समकालीन वास्तवाचे अतिशय सुंदर चित्रण.गावखेड्यात आज शहराचे भन्नाट वारे सुटले आहे.जुनी जानती पिढी आता राहिली नाही.पण माणसं माणसापासून दुर जाता आहेत.लोकं एकलकोंडी,नालगोंडी झाली आहेत.एकूणचं इमान,गहाण ठेऊन बेईमानी नसात घुसली आहे.चांगल्या वाईट घटनेचा परिपोष म्हणजे ह्या कथा अतिशय दमदार झाल्या आहेत.अहोरात्र मेहनत काबाड कष्ट करण्याची व्यथा वेदनांवरफुंकर घालीत या कथांचे सुत्र आहेत.जसे'फाटक्यात पाय"आसरा' या कथांनी आजच्या शेतकऱ्यांना प्रचंड यातना सहन कराव्या लागतात.त्यांच्या प्रचंड झुंजेचे चिंतन चिकित्सक कथानक मन हेलावून टाकते.आबासाहेबघावटे ग्रामीण भागातील बोली शैलीने मराठी साहित्य विश्वात एक ठळक नावं आहेच.आजच्या समकालीन वास्तवाचे भंयकर वास्तव म्हणजे मुलं मुली शिक्षण घेऊन उच्च विभूषित झाले आहेत.मायमातीची जिव्हाळ्याचे नाते व्हते, कनिष्ठ नोकरी, मध्यम व्यापार, उच्चतम शेती.या वास्तवाचे भान देतं एक उत्तम कथा कुणबी करणाऱ्यांच्या वाट्याचं दु:ख आबासाहेबांनी मांडले आहे.आज कुणबीक, शेतकऱ्यांना कुणी मुलगीच देतं नाही.या मुळंग्रामीण भागातील मुलांचे वय वाढत चालले आहे गावोगावी लग्नाचे दलाल झाले आहे.मुलं व्यसनी झाल्याने गाव खेड्यातील आनंदाचे दिवसचं राहिले नाहीत.भंयकरव्यसनाधीनता आणि सामाजिक अराजक्ता वाढली आहे.मुलगा चांगला उच्च विभूषित, घरदार चांगलं, तरीही लग्न जमत नाहीत तर का? नोकरी नाही.म्हणून 'दिड लाखाचीबायको 'ही कथा अतिशय विद्वविग्न करून जाते.गावाच्या वेशी नव्याने सजल्या पण ती मायाळू व कनवाळू माणसं दिसतं नाही.सारेच नी सगळंच मोबाईलधारी अन् किक्कमारी,पियाला पाणी बिस्लरी.या कथेनं एक सामाजिक व सर्वव्यापी चिंतन आशय दिला आहे.तर गावठाण विस्तारलं पण 'झुंज' जगण्याची, मरण्याची, वास्तवाच्या विस्तवावर तळण्याची.अशी कथा येतेच तीमनस्वी दु:ख देऊन जाते.'उकिरड्यावरचं सोनं' या कथेतील नायिका तिचा प्रचंड वेदनेचा संघर्ष पण त्या संघर्षाचा टिळा कपाळी गोंदण ही नायिका नांदूनचं दाखवते.ज्या आज्जीने तिचे संगोपन केले होते.तिला सुखाचा मायाळू बटवा देण्याचे राहुन जाते.पण अशीच एक धर्माची माय आज्जी तिला भेटते तिला सुख देण्याचीपुण्याई आपल्या पदरात पाडून घेते.अशा अंतरंगी चारगाठी बांधून या कथा आल्या आहेत.या कथा माणसातलं माणुसकीचं गहिवरलेपण दाखवून देतात.भला माणूस म्हणून जन्माला आलो तर माणुसकी वाटण्याचं कार्य या माणसाच्या हाताने झाले पाहिजे.कोणत्याही बाईला आपल्या मायेचं घर ते माहेर तिला मायेचा ओलावा आहे.ती मुराळी येईल म्हणून भावाची आतूरतेने वाट पाहते.'मुराळी'या कथेतील हे भावबंध अतिशय आशय संपन्न अभिव्यक्त झाले आहेत.कथा, कथानक आशय व पात्र यांचा सामाजिक स्तर विस्तार हा शहरी व निमशहरी असल्याने ही कथा अतिशय दमदार पद्धतीने आली आहे.कथाकार म्हणून लेखन शैली ही लालित्यपूर्ण असल्याने ती वाचनाभिमुख झाली आहे.संत साहित्याचे अभ्यासक जेष्ठ साहित्यिक दत्ता गोसावी पाठराखण करताना लिहितात 'लावण्या' या संग्रहातील कथा ही आबासाहेबांच्या वैशिष्ट्येपुर्ण शैलीचा परिचय करून देतात.प्रत्येक माणसाच्या मनातील भावनिक आंदोलनाचा त्याच्या व्यथा वेदनाचा, त्यांच्यातील संगती, विसंगतीचा,नियतीशी चाललेल्या त्यांच्या संघर्षाचा, त्यांच्या विजिगीशू वृतीचा हृदयस्पर्शी आलेख कथाकारांने या कथांमध्ये रेखाटला आहे.सर्वच कथांमध्ये काव्यमय वर्णनाची सुरेख पखरण असल्यामुळे शेती मातीचा अस्सल गंध असलेल्या कथा कमालीच्या वाचनीय झाल्या आहेत "(पाठराखण) सन्मित्र आबासाहेब घावटे सर हे सिद्धहस्त लेखक आहेतच.त्यांची कथाही आपल्या गाव शिवाराचीअस्वस्थ वर्तमानाची नोंद घेणारी झाली आहे.आज गावं शिव आणि अर्बळल्यावांनी कुणबी झाली आहे.हातमजूर,रोजगार, मोलमजुरी, करण्यासाठी शहराच्या तावडीतपिळवटून निघणारा शेतीमध्ये त्याचं मन लागत नाही.कारण त्याच्या पिकवण्याला हमी भाव नाही.म्हणून तो 'नगदी पीक अन् शहरात जाऊन विक्' नाहीतर नोकरी ची भिकं मागणं आलं.अशी साक्षात वास्तवाचे चटके सहन करणारी कथा 'लावण्या' या कथा संग्रहात आहे.शेती असो की माती, माय बाईच्या वाट्याला दु:ख हे सदोदित पुजलेले आहे.भुईचं सौंदर्य हे हिरवं फुलण्यात आहे.तसंबाई कितीही 'लावण्यावती'असो तिचं झिजून बुजून जाणंच या पुरुषप्रधान संस्कृतीने दाखवून दिलं आहे.तिला सत्ता प्रतिष्ठा मान दिला जातो पण ती केवळ कठपुतळीच होऊन जाते या व्यवस्थेची.अशा कथा सारं असलेल्या या कथा आहेत.जेष्ट साहित्यिक मुंकूदराज कुलकर्णी अतिशय आशय संपन्न प्रस्तावनेत लिहितात "आबासाहेबांच्या कथांमधून नियतिशरण माणसे जसे दिसतात तसे नियतीशी दोन हात करणारे, विजयश्री खेचून आणणारे जिद्दी माणसेही दिसतात.कथाकार हे कवी असल्यामुळे सर्वच कथांमध्ये काव्यमय वर्णनाची सुरेख पखरण आहे.(प्रस्तावना)खरे म्हणजे आत्मिक स्वानंद जेव्हा एखादी अस्सल सल घेऊन येतो.तेव्हा ती कविता होऊन जाते.पण ती ठणक कायम राहील तर ती कथेचं रुप धारण करते.माणूस थकतो पिचतो तो वृद्धत्वा कडे झुकतो तेव्हा त्याचे असाह्य जगणं ही अस्वस्थ मनाची हुंकार देणारी कथा असते.म्हणून या कथा केवळ रंजन करतं नाहीत तर वाचकांच्या मनाला आत्मचिंतन करायला लावते.अशा सामाजिक भान देणाऱ्या कथा आहेत.सन्मित्र कवी कथाकार आबासाहेब घावटे सरांना हार्दिक शुभेच्छा.



**पुस्तकाचे नांव:-लावण्या(कथासंग्रह)**
**लेखक:-आबासाहेब घावटे**
**प्रकाशक:-समर्थ प्रकाशन, बार्शी**
**मुखपृष्ठ:-प्रकाश उमाटे, राहुल भालके**
**प्रथमावृती:-22 सप्टेंबर 2025**
**मुल्य:-150 /रूपये**
**पुस्तक परिचय:- डॉ प्रभाकर शेळके**
**जालना**

## समतेचा सवाल अजून जिवंत आहे

समतेच्या नावाखाली किती काही लुटले आहे,
हक्कांच्या वाटपातून भविष्यच कापले आहे.

ज्ञानाच्या दारावरती कुलूपच बसवले आहे,
मोजक्यांनी किल्लीवर पहारे ठेवले आहे.

कोणी जरा बोलले तरी सत्यच दाबले आहे,
प्रश्न विचारण्यालाच गुन्हेगार ठरवले आहे.

“मेरिट”च्या आरशातून वारसच झळकले आहे,
कष्टांचे खरे चेहरे मागेच ढकलले आहे.

संविधान ओठांवर, कृतीत दडपले आहे,
समतेच्या वाटेत अडथळेच रचले आहे.

ज्यांच्या अश्रूंवरती इतिहास लिहिले आहे,
त्यांच्या वेदनांना काळानेच जपले आहे.

न्यायाच्या नावाखाली खेळच रंगवले आहे,
खोट्यांनी चेहऱ्यावर मुखवटे चढवले आहे.

दाबलेले आवाज जेव्हा सारे उठले आहे,
सिंहासनांचे पाया थरथर कापले आहे.

प्रकाश असूनही का अंधार जपले आहे,
समतेचा सूर्य कोणी रोखू शकले आहे.

**प्रभाकर गायकवाड**
**छत्रपती संभाजीनगर**

प्रवेश सुरू
बी.ए. मराठी व उर्दू माध्यम
एम.ए
मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू
बालसंगोपन
डीप्लोमा गांधी विचार
मानवी हक्क प्रमाणपत्र
संपर्क
9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ०५ फेब्रुवारी २०२६


## निपुण भारत अभियानाची पाहणी : केनिया शिष्टमंडळाची माळीवाडा येथे भेट



**दौलताबाद (जावेद अहमद) :** निपुण भारत अभियान ची केनिया देशाच्या शिष्टमंडळाने माळीवाडा येथे भेट दिली व माता—पालक गट उपक्रमाची पाहणी केली.निपुण भारत / निपुण महाराष्ट्र अभियानांतर्गत पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान अभियानाची सर्वसमावेशक व प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी प्रत्येक शाळा व गाव पातळीवर वाडी—वस्तीनिहाय इयत्ता 1 ली ते 3 रीच्या विद्यार्थ्यांच्या माता—पालक गटांची स्थापना करण्यात आलेली आहे. या उपक्रमाअंतर्गत छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सर्व प्राथमिक शाळांमध्ये माता—पालक गट कार्यरत असून, जिल्ह्यातील 1901 शाळांअंतर्गत वाडी—वस्तीनिहाय एकूण 10,896 माता—पालक गट मुलांच्या शिक्षणप्रक्रियेत सक्रिय सहभाग घेत आहेत.निपुण भारत / निपुण महाराष्ट्र अभियानाचा मुख्य उद्देश इयत्ता 3 पर्यंत सर्व विद्यार्थ्यांनी पायाभूत भाषा व गणित विषयातील आवश्यक कौशल्ये आत्मसात करावीत हा आहे. या उद्दिष्टपूर्तीसाठी घरातील शिकण्याचे वातावरण, पालकांचा सहभाग आणि मुलांबाबतची जागरूकता यांची महत्त्वाची भूमिका आहे. मुलं शाळेत शिकण्याबरोबरच घरात अनुकरण, खेळ, संवाद व विविध कृतींमधून अधिक प्रभावीपणे शिकतात. त्यामुळे माता—पालक हे मुलांच्या शिक्षणातील पहिले व सर्वात महत्त्वाचे घटक मानले जातात. याच तत्त्वावर माता—पालक गट ही संकल्पना राबविण्यात येत आहे.या उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी पाहण्यासाठी केनिया देशाच्या शिष्टमंडळाने अभ्यास दौऱ्याच्या निमित्ताने आज छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, माळीवाडा येथे भेट दिली. यावेळी विदेशी पाहुण्यांनी माता—पालक गटांशी प्रत्यक्ष संवाद साधला. माता—पालक मुलांच्या शिक्षणात कशा प्रकारे सहभागी होत आहेत, शिक्षक व माता—पालक एकत्रितपणे मुलांच्या शैक्षणिक गुणवत्तावाढीसाठी कसे कार्य करत आहेत, तसेच निपुण अभियानांतर्गत तयार करण्यात आलेल्या आयडिया व्हिडिओमधील विविध कृती मुलांसोबत कशा प्रकारे राबविल्या जातात, याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.या अभ्यास दौऱ्यात सहभागी अँथनी मझंगे म्वाक्वाशा, ओटिएनो जॅक स्टीव्ह, केनेथ मुरिमी बिदान,महिला रीटा अटिएनो ओधियाम्बो,भारतीय प्रतिनिधी रोहित शिंदेडॉ. उत्कर्ष श्रीवास्तव विजय केकाणयांची उपस्थिती होती.या प्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक फेरोज तडवी, सरपंच ज्योती नंदकुमार मुळे,उपसरपंच मणेश गजरे, सदस्य प्रवीण बर्डे ,तसेच शाळेतील सर्व शिक्षक उपस्थित होते.केनिया देशातील शिष्टमंडळाने छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात निपुण भारत अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या माता—पालक गट उपक्रमाचे विशेष कौतुक केले. पालकांचा सक्रिय सहभाग, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि शाळा व घर यामधील प्रभावी समन्वयामुळे विद्यार्थ्यांच्या अध्ययन क्षमतेत सकारात्मक बदल होत असल्याचे त्यांनी नमूद केले. हा उपक्रम इतर देशांसाठीही प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

## शाश्वत शेतीसाठी गोदरेज ॲग्रोव्हेटसोबत करार महत्त्वपूर्ण : मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई :** (भगवंत पाळवदे-बीड जिल्हा संपादक) "महाराष्ट्रातील शेतकरी हे राज्याच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहेत. शेतीवर अवलंबून असलेल्या हजारो कुटुंबांमध्ये महिलांची भूमिका निर्णायक आहे. गोदरेज ॲग्रोव्हेटसोबतचा करार शाश्वत शेती, महिला सक्षमीकरण आणि ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट करण्याच्या राज्य शासनाच्या कटिबद्धतेचे प्रतीक असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.राज्यातील महिला शेतकऱ्यांना सक्षम करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली गोदरेज ॲग्रोव्हेट लिमिटेड आणि महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (एमएसआरएलएम—उमेद) यांच्यात महत्त्वपूर्ण सामंजस्य करार करण्यात आला आहे. या करारामुळे राज्यातील नऊ कापूस उत्पादक जिल्ह्यांतील पाच हजारांहून अधिक महिला शेतकऱ्यांना शाश्वत व आधुनिक शेती पद्धतींचे प्रशिक्षण मिळणार आहे.महिला शेतकरी सक्षमीकरणाच्या दिशेने महत्वाचे पाऊलमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, "महाराष्ट्रातील शेतकरी हे आपल्या राज्याचा कणा आहेत. हजारो कुटुंबांची उपजीविका शेतीवर अवलंबून असून, त्यातील अनेक कुटुंबाचे नेतृत्व कर्तत्ववान महिला करत आहेत. अशा शेतकऱ्यांना सुलभ कर्ज आणि आवश्यक मदत वेळेवर मिळावी यासाठी शासन कटिबद्ध आहे. या पार्श्वभूमीवर गोदरेज ॲग्रोव्हेटसोबतची भागीदारी ही शाश्वत कृषी पद्धती आणि लैंगिक समावेशनाबाबत आमच्या बांधिलकीचे प्रतीक आहे. आधुनिक तंत्रज्ञान आणि वैज्ञानिक शेती पद्धतींच्या माध्यमातून ग्रामीण भागातील विशेषतः महिला शेतकरी आत्मनिर्भर बनून राज्याच्या अर्थव्यवस्थेत मोलाचे योगदान देतील, यासाठी हे पाऊल महत्त्वाचे ठरेल, महिला शेतकऱ्यांना वैज्ञानिक शेती पद्धती, बाजारपेठेतील संधी आणि माहितीपूर्ण निर्णयक्षमतेस सक्षम करून, हा उपक्रम महाराष्ट्रातील शेती उत्पादनक्षमता, उपजीविका आणि ग्रामीण टिकाऊपणा यामध्ये दीर्घकालीन सुधारणा साधण्याचा यशस्वी प्रयत्न आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. उपक्रमाची व्याप्ती आणि उपयुक्ततासंयुक्त राष्ट्रांनी 2026 हे आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष म्हणून घोषित केल्याच्या पार्श्वभूमीवर हा तीन वर्षांचा उपक्रम राबवण्यात येणार आहे. महाराष्ट्रातील नऊ कापूस उत्पादक जिल्ह्यांतील 5 हजारहून अधिक महिला शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी गोदरेज ॲग्रोव्हेट आणि महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांचा सामंजस्य करार करण्यात आला आहे. या अंतर्गत महिला शेतकऱ्यांना चांगल्या कृषी पद्धती (जीएपी) आणि एकात्मिक कीड व्यवस्थापन (आयपीएम) याबाबत प्रशिक्षण देण्यात येईल, ज्यामुळे उत्पादन खर्च कमी होऊन उत्पन्नात वाढ होण्यास मदत होणार आहे. राज्य शासन महिला शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान, वैज्ञानिक मार्गदर्शन आणि बाजारपेठेशी जोडण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे. महिला शेतकरी वर्गाला सक्षमकरण्याच्या दिशेने हे निश्चितच एक महत्वपूर्ण पाऊल आहे.ही तीन वर्षांची भागीदारी स्वयं-सहायता गट (एसएचजीएस) आणि महिला शेतकऱ्यांना चांगल्या कृषी पद्धती (जीएपी) आणि एकात्मिक कीड व्यवस्थापन (आयपीएम) स्वीकारण्यासाठी प्रोत्साहित करेल, ज्यामुळे शेती उत्पादनक्षमता वाढून शाश्वत व सक्षम उपजीविका निर्माण होणार आहे.50 हजार एकर क्षेत्रावर पाच हजारांहून अधिक महिला शेतकरी आणि 100 स्वयंसहायता गट यांना उपक्रमाचा लाभया योजनेच्या पहिल्या टप्प्यात नागपूर, अमरावती, यवतमाळ, वाशिम, परभणी, जळगाव, बीड, अकोला आणि नांदेड या नऊ जिल्ह्यांचा समावेश आहे. 50 हजार एकर क्षेत्रावर पाच हजारांहून अधिक महिला शेतकरी आणि 100 स्वयंसहायता गट या उपक्रमाचा लाभ घेणार आहेत. पुढील तीन वर्षांत हा उपक्रम 500 हून अधिक स्वयंसहायता गटांपर्यंत विस्तारण्यात येणार आहे. तसेच कापसाबरोबरच मका व इतर पीक उत्पादक शेतकऱ्यांपर्यंतही हा उपक्रम पोहोचवण्याचा मानस आहे.या कराराअंतर्गत एमएस आरएलएम— उमेदकडून स्वयंसहायता गट व कृषी सखी नेटवर्कद्वारे महिला शेतकऱ्यांचे संघटन व समन्वय साधला जाणार आहे. तर गोदरेज ॲग्रोव्हेटकडून प्रशिक्षण कार्यशाळा, प्रात्यक्षिक शेतजमिनी, शेतकरी क्षेत्रशाळा व सुरक्षितता किट्स पुरवण्यात येणार आहेत. या सामंजस्य कराराअंतर्गत, गोदरेज ॲग्रोवेट आणि एमएसआरएलएम उमेद संयुक्तपणे जीएपी, आपीएम आणि सुरक्षितता पद्धतींवरील प्रशिक्षण कार्यशाळा, शेतकरी क्षेत्रीय शाळा (Farmer Fie ld Schools), प्रात्यक्षिक प्लॉट्स आणि सुरक्षितता किट्सचे वितरण करणार आहेत

## कन्नडमध्ये प्रथमच RFID तंत्रज्ञानयुक्त पोलीस मैदानी चाचणी





**कन्नड (प्रतिनिधी) :** कन्नड तालुक्यातील मिशन ऑफीसर्स स्पर्धा परीक्षा केंद्र ही अकॅडमी प्रामुख्याने पोलीस भरती, लष्कर (Army), पूर्वतयारी करून घेणारी एक अग्रगण्य संस्था आहे.कन्नड मधील तालुका क्रिडा संकुल या मैदानावर महाडेमो (महासराव) चांगलाच रंगला पोलीस भरती ही नुकतीच तोंडावर आलेली असून पोलीस भरती करिता कन्नड शहरातील मिशन ऑफिसर्स स्पर्धा परीक्षा केंद्र हिवरखेडा रोड कन्नड या केंद्राचे संचालक पांडूरंग राठोड उपसंचालक अंकुश चव्हाण यांनी भावी पोलीसांच्या मनातील दडपण भिती काढून टाकण्यासाठी कन्नड शहरात पहिल्यांदाच चिप (सेंन्सर) आर एफ आय डी (RFID) अनुसार पोलीस भरती महाडेमो घेतला यामुळे पोलीस भरती देणा-यांच्या मनातली भिती दुर होईल.प्रत्यक्ष मैदानी चाचणी महिला १०० मी धावणे,८०० मी धावणे, गोळाफेक आणी पुरूषांचे १०० मी धावणे,१६०० मी धावणे गोळाफेक इत्यादी मैदानी चाचणीचा महा सराव घेण्यात आला आणि दुस-या दिवशी १०-१५ फुटांच्या अंतरावर लेखी परीक्षा घेण्यात आली.या अकॅडमी ची शिकवण्याची पद्धत आणि प्रशिक्षणाची गुणवत्ता ही कन्नड शहरामध्ये सुप्रसिध्द ठरत आहे पोलीस भरती महाडेमो गोळाफेक तंत्राचा सराव घेतला.३०० पेक्षा जास्त पोलीस भरतीची आवड असणा-यांनी सहभाग नोंदवला होता त्यामध्ये१२ विद्यार्थी मैदानी चाचणी मध्ये ४७ मार्क्स घेतले व ३२ विद्यार्थी ४५ मार्क्स घेतले.यामध्ये संचालक पांडूरंग राठोड यांनी या अकॅडमी तन आणी मन लावून विद्यार्थीना घडवण्याचे काम करत आहेत असे या पोलीस भरती महाडेमोतून दिसून आले त्यावेळी या मिशन ऑफीसर्स स्पर्धा परीक्षा केंद्राचे जास्तीत जास्त विद्यार्थी यशाचे शिखर गाढतील अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ०५ फेब्रुवारी २०२६


## आदिवासी ठाकर भिल्ल समाजाचे संघर्ष योद्धा जालम गांगड काळाच्या पडद्याआड




**खुलताबाद (सनिराम गावंडे)** : ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते आणि आदिवासी ठाकर कष्टकऱ्यांची नेते कै जालम गांगड (वय ५७) यांचे दिनांक ३ जानेवारी २०२६ रोजी मंगळवारी सकाळी ११:०० वाजता निधन झाले त्यांचा अंत्यविधीचा कार्यक्रम ३ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ७:३० वाजता झाले त्यांनी ठाकर समाजाला विविध माध्यमांतून प्रेरणा देवून समाजाला एकत्रित करण्याचे काम केले त्यांनतर कष्टकऱ्यांच्या व आदिवासी ठाकर -भिल्ल समाजाच्या हक्कांसाठी लढणारे गेल्या १ महिन्यापासून शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय छत्रपती संभाजीनगर (घाटी) या शासकीय रुग्णालयात उपचार घेत होते त्या दरम्यान त्यांचे निधन झाले. लाल बावटा, कम्युनिस्ट पक्ष, आदिवासी ठाकर ठाकुर उन्नती मंडळ महाराष्ट्र राज्य, शेतकरी मजूर कष्टकरी अशा विविध संघटनेच्या माध्यमातून आदिवासी ठाकर भिल्ल समाजासाठी त्यांनी अखेरच्या श्वासापर्यंत अत्यंत तळमळीने काम केले या असंघटित आदिवासी ठाकर समाजासाठी जातीचे प्रमाणपत्र, वन जमिनीतील ७/१२, पाण्याची व्यवस्था, गल्ली रस्ते, सभामंडप अशा अनेक योजनेचा लाभ ठाकर समाजाला मिळावा म्हणून त्यांनी खूप प्रयत्न केले आणि त्यांचे प्रयत्न यशस्वी पण झाले कै जालम गांगड यांनी ठाकर समाजासाठी १९८८ पासून आदिवासी समाज सेवेला सुरुवात केली हे एक समाजसेवक बरोबरच एक उत्कृष्ट तमाशा व कलाकार व्यक्ति होती त्यांनी ठाकरवाडीतील इतर वाडीतील ठाकर समाज असो की कोणत्याही समाजाचा व्यक्ती असो त्यांना कधी पण हसून आणि विनोद करूनच बोलायचे त्यांनी भीमा भाऊ मधे तमाशा मंडळ हा गावठी तमाशाची सुरुवात केली त्यातून वाडीतील लोकांना त्यांच्या कलेतून लोकांचे मनोरंजन करायचे त्यांनी अनेक लोकांच्या मनामध्ये घर करून घेतले होते नंतरच्या काळात त्यांनी सरपंच उपसरपंच सदस्य ही पदांमध्ये सुद्धा काम केले लाल बावटा, कम्युनिस्ट पक्षाच्या सदस्य पदाची त्यांनी धुरा सांभाळली वन जमिनीसाठी केलेल्या अनेक आंदोलनात नेहमीच आघाडीवर अग्रस्थानी राहायचे वन जमिनी ७/१२ मिळवण्यासाठी त्यांनी व गावकऱ्यांनी मिळून फॉरेस्ट ऑफिसर कर्मचारी सळोकी पळो करून सोडले होते आणी त्यांनी आदिवासी ठाकर भिल्ल समाजाला अखेर वनपट्ट्यातून ७/१२ मिळवून दिले जमिनीच्या लढ्यात सर्वात पुढे राहणारा जालन गांगड आपल्यातून निघून गेला तरी त्यांच्या कितीतरी आठवणी सांगण्यात सारख्या आहेत एकेकाळी ठाकरवाडीला पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नव्हती त्यांनी त्यांच्या स्वतःच्या विहिरीतून वडीला पाणी पाजले समाज मंदिर, स्ट्रिट लाईट, जिल्हा परिषद शाळा व वाडीतील सार्वजनिक व्यवस्था करण्यात पुढाकार घेणारा माणूस जालन गांगड यांना आज आपण मुकलो आहोत जालन गांगड यांनी अनुसूचित जमातीचे दाखले मिळवण्यासाठी अथांग केलेले प्रयत्न त्यांनी २००९ साली उपविभागीय अधिकारी, तहसीलदार महसूल अधिकारी तलाठी, ९ आमदार कर्मचाऱ्यांना बोलावून निरगुडी बु ठाकरवाडी येथे महाराष्ट्रातील पहिला कॅम्प आयोजित करून ठाकर,भिल्ल समाजातील लोकांना जातीचे दाखले मिळून दिले. त्याचबरोबर जात वैधता प्रमाणपत्र मिळवण्यासाठी प्रयत्न करुन ते मिळवले ते सर्व श्रेय जालम गांगड यांना दिले जाते अनुसूचित जमातीतील ठाकर समाजाला जे मिळवता येईल ते सर्वच आणण्याचा प्रयत्न जालनम गांगड यांनी केले आहे त्यात त्यांनी ७० टक्के यश देखील मिळवले विविध भागातील अधिकारी कार्यकर्ते पुढारी, पदाधिकारी, समाजसेवक आमदार खासदार आणि वेगवेगळ्या संघटनेचे प्रतिनिधी, पदाधिकारी यांच्याशी त्यांची खास ओळख परिचय असल्याने ते आपल्या खास शैलीतून हातोहात काम करून घेण्याचा त्यांचा हातखंडा अतिशय चांगला होता शेतकरी मजूर कष्टकरी खुलताबाद तहसील कार्यासमोरील बेमुदत आंदोलन हे दि.०८ मार्च २०२३ रोजीचे आंदोलन शेवटचे ठरले जालम गांगड यांनी सुभाष लोमटे, कासमभाई यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन केले होते ज्येष्ठ आदिवासी समाजसेवक जालम गांगड यांच्या निधनाची वृत्त अतिशय दु:खद असल्याचे म्हणत माजी सभापती भीमराव खडांगळे,जगन्नाथ (बापू) खोसरे,कुणाल दांडगे यांनी त्यांना श्रद्धांजली वाहिली आहे आदिवासी ठाकर परंपरेतील एक मौलिक व्यक्तिमत्व आज आपल्यातून निघून गेले ते कायम स्मरणात राहतील त्यांचे विचार येणा-या पिढ्यांना प्रेरणा देत राहतील मी व ठाकरवाडीतील सर्व गावक-यांनी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

## ग्रामीण आदिवासी भागातील विकासासाठी सरकार कटीबद्ध- महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**कन्नड (अरुण थोरात)** : जेहूर जि.प. गटाचा सर्वांगिण विकासासाठी भाजपलाच मतदान करण्याचे अवाहन राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले आहे.ते जेहूर ता.कन्नड येथे आयोजित प्रचारसभा प्रसंगी बोलत होते. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात भाजप सरकारने अनेक कल्याणकारी योजना अंमलात आणल्या आहेत. सर्व सामाजिक घटकांना समान न्याय, संधी, महिलांचा विकास, लाडकी बहिण योजना, लखपती दिदि योजना, शेतकरी सन्मान, बीज बिल माफी, सोलर पंप योजना, यातून ग्रामीण भागाचा विकास होत आहे. डोंगराग्रस्त आदिवासी बांधवांच्या व इतर ग्रामस्थांचे शासकीय जमिनी वरती असलेली घरे कायदेशीररित्या नियमानूकुलीत करण्यासाठी सरकार प्रयत्न शितल आहे. असे ही त्यांनी यावेळी आश्वासित केले. माजी केंद्रीय अर्थ राज्यमंत्री खा.डॉ. भागवत कराड यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, विविध योजनांच्या माध्यमातून जेहूर जि.प. गटात आपण अनेक योजना दिल्या आहेत. त्यामुळे येथील मतदार सदैव आपल्या पाठीशी आहे. आणि भविष्यात ही राहणार आहे. खेड्यापाड्या अधिकाधिक योजना राबविण्यासाठी भाजप उमेदवारांना साथ देण्या अवाहन केले. प्रास्ताविक भाषणात भाजप जिल्हाध्यक्ष संजय खंबायते यांनी " या भागातील उमेदवार असलेल्या आदिवासी, शेतकरी कार्यकर्त्यांना आशिर्वाद देण्यासाठी मंत्री महोदय आले आहेत. डॉ. कराड यांनी या गटात दहा हजार शेतकऱ्यांना मोफत बियाणे वाटप, नाबाड, मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून रस्ते बांधणी केली आहे. सरकारच कोट्यवधी रुपयांचा विकास निधी आपण या गटात आणणार असल्याचे सांगितले, जिल्हासरचिटणीस सुभाष काळे यांनी आपल्या मनोगतांतून गटातील समस्या मांडल्या. याप्रसंगी विविध पक्षांतील शेकडो कार्यकर्त्यांनी मंत्री बावनकुळे यांच्या हस्ते पक्षप्रवेश केला.सुत्रसंचलन विलास इंगळे यांनी केले. याप्रसंगी भाजप प्रदेश सचिव किरण पाटी, भाजप जिल्हासरचिटणीस सुभाष काळे, जिल्हाध्यक्ष रामा मुळे, जिल्हा सचिव अनिल चव्हाण, मा.जि.प.सदस्य सुरेश गुजराणे, मा.पंस. उपसभापती सुनिल निकम, नगर सेवक सुधाकर देवकर,
जि.प.गट उमेदवार मंजूषा मलदुडे, गण उमेदवार बाळू मधे, प्रभाकर बागुल, ओबीसी मोर्चा तालुकाध्यक्ष सुदाम पवार, दिनकर दाभाडे, अरुण थोरात, रतन मधे, आदींसह शेकडो पदाधिकारी, बुथ प्रमुख, शक्तिकेंद्र प्रमुख, मतदार, नागरिक उपस्थित होते.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स अँण्ड प्रिंटर्स

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

मो. 8087880274,8956362639, 9270446603, 9405109103

डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274

Email - sahilcomputer05@gmail.com

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002